महाराष्ट्र वैद्यक व्यवसाय अधिनियम १९६१ मधील कलम ३७ नुसार ग्रामीण भागात अनोंदणीकृत व्यवसायिकास वैद्यकिय व्यवसाय करण्यास अनुमती देताना अनुसरावयाची मार्गदर्शक तत्वे.

# महाराष्ट्र शासन

वैद्यकिय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग
शासन निर्णय क्र. एमआयएस २०००/२५३०/प्र.क्र. ३४/०१ अधिनियम
दि. १८ मार्च, २००२.

**प्रस्तावना:-** महाराष्ट्र वैद्यक व्यवसायी अधिनियम १९६१ मधील कलम ३७ मधील तरतूदीनुसार ग्रामीण भागात कोणीही व्यक्ती, जरी ती अनोंदणीकृत व्यवसायिक असेल, तरी वैद्यकिय व्यवसाय करू शकते. परंतु या कलमातील अटींची पुर्तता होणे आवश्यक आहे. या कलमाच्या आधारे ग्रामीण भागात व्यवसाय करीत असलेल्या वैद्यकिय व्यवसायिकांना या अधिनियमात अनधिकृत वैद्यकिय व्यवसायाकरिता विहीत करण्यात आलेल्या दंडात्मक कारवाईपासून सूट देण्यात आलेली आहे. कलम ३७ मधील तरतुदी खालीलप्रमाणे आहेत:-

३७. या प्रकरणामध्ये कांहीही अंतर्भूत असले तरी एखादी व्यक्ती कोणत्याही ग्रामीण भागात वैद्यकिय व्यवसाय करू शकेल-----

१) जर त्या व्यक्तीने त्या ग्रामीण भागात आपला वैद्यकिय व्यवसाय, बॉम्बे मेडिकल ॲक्ट,१९१२ किंवा बॉम्बे मेडिकल प्रॅक्टीशनर्स ॲक्ट,१९३८ ( किंवा कोणत्याही तत्सम ॲक्टअन्वये ) किंवा बॉम्बे होमिओपॅथीक ॲक्ट १९५१ ( किंवा होमिओपॅथी किंवा बायोकेमिक व्यवसायींच्या शैक्षणीक पात्रता व रजिस्ट्रेशन बाबतच्या कोणत्याही तत्सम ॲक्टअन्वये ) याखाली नोंदणीकृत वैद्यकिय व्यवसायीने त्या ग्रामीण भागात ज्या तारखेस वैद्यकिय व्यवसाय सुरू केला असेल त्या तारखेआगोदर सुरू केला असेल व त्या व्यक्तीचा व्यवसाय नियमितपणे चालू असेल,

२) जोपर्यंत ती व्यक्ती व्यवसायाचे प्रमूख ठिकाण म्हणून त्या ग्रामीण भागात आपला वैद्यकिय व्यवसाय चालू ठेवेल तोपर्यंत वैद्यक व्यवसाय करता येईल.

उक्त कलमातील अटींची पूर्तता करीत असलेल्या वैद्यकिय व्यवसायिकांविरूध्द कारवाई करू नये असे शासनाने वेळोवेळी निदेश दिलेले आहेत. कांही व्यवयायिकानी त्यांच्यावर कारवाई होऊ नये, या उद्देशाने मुंबई हाय कोर्टात याचिका दाखल केल्या. याचिका क्र.२९१५ / २००१ श्री. आबाजी गुंडू गायकवाड वि. महाराष्ट्र शासन या प्रकरणी मुंबई उच्चन्यायालयाने दि.२६.६.२००१ रोजी दिलेल्या न्यायनिर्णयामध्ये याचिकाकर्त्यास व शासनास उच्चन्यायालयाने असे निदेश दिले आहेत की याचिकाकर्त्याने ते कलम ३७ खाली व्यवसाय करीत असल्याबद्दलचा पुरावा व अन्य माहिती यासह शासनाकडे अर्ज करावा, सक्षम अधिका-याने सदर व्यवसायिक कलम ३७ मधील अटींची पूर्तता करतो अथवा कसे याबद्दल निर्णय घ्यावा. जर तो व्यवसायिक या अटींची पूर्तता करीत नाही, असा सक्षम अधिका-याचा निर्णय असेल तरच सदर व्यवसायिकांवर कारवाई करण्यात यावी. अशाप्रकारच्या अर्जावर जोपर्यंत शासनाकडून निर्णय घेतला जात नाही, तोपर्यंत त्यांच्यावर कारवाई करण्यात येऊ नये. अशा प्रकारच्या अनेक याचिकादर याप्रमाणेच मुंबई उच्चन्यायालयाने निर्णय दिला आहे.

कलम ३७ खाली व्यवसाय करीत असलेल्या व्यवसायिकांनी दाखल केलेल्या याचिका क्र.१५१०, १५२०, १५५६ व १५५९ / २००१ या प्रकरणी व्यवसायिकांचे दावे तपासून पहाण्यासाठी संबंधित जिल्ह्याच्या पोलीस अधिक्षकांकडून संबंधित व्यवसायिकांनी कधी व्यवसाय सुरू केला होता, त्यावेळी कोणी नोंदणीकृत वैद्यकिय व्यवसायिक संबंधित खेडेगावात व्यवसाय करीत होता का?, त्यांची अर्हता कोणती आहे?, ते कोणत्या पॅथीमध्ये व्यवसाय करतात, इ. बाबतीत अहवाल मागविण्यात आला होता. या अहवालावरून मुंबई उच्चन्यायालयाने जो निर्णय दिला आहे त्यावरून असे स्पष्ट होते की, कलम ३७ च्या आधारे व्यवसाय करणा-या व्यक्तींना ॲलोपॅथी व होमिओपॅथीमध्ये व्यवसाय करण्याचा अधिकार उच्चन्यायालयाने नाकारला आहे, कलम ३७ खाली व्यवसाय करीत असणारी व्यक्ती जर आयुर्वेदामध्ये व्यवसाय करीत असेल तरच त्यास या कलमाखाली अपवाद ठरविण्याचे संरक्षण मिळू शकेल.

उक्त न्यायनिर्णय विचारात घेऊन, कलम ३७ खाली व्यवसाय करीत असल्याचे कथन करणारे दावे कशाप्रकारे तपासून पहावेत, त्यासाठी सक्षम अधिकारी कोण राहील, इ. विषयी मार्गदर्शक तत्वे विहीत करण्याबाबतची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

## निर्णय:-

वर प्रस्तावनेत दिलेल्या न्यायनिर्णयानुसार महाराष्ट्र वैद्यक व्यवसायी अधिनियम १९६१ मधील कलम ३७ खालील तरतूदीच्या आधारे व्यवसाय करीत असलेल्या किंवा व्यवसाय करण्याची इच्छा असलेल्या व्यक्तींच्या अर्जावर निर्णय घेऊन, ते जर कलम ३७ खालील अटींची पूर्तता करीत असतील तर त्यांना व्यवसाय करण्यास अनुमती देण्याकरिता शासन खालीलप्रमाणे मार्गदर्शक तत्वे विहीत करीत आहे.

## मार्गदर्शक तत्वे

**अ) महाराष्ट्र वैद्यक व्यवसायी अधिनियम १९६१ मधील कलम ३७ खालील तरतूदीच्या आधारे ग्रामीण भागात व्यवसाय करण्यास अनुमती खालील अटींची पूर्तता करणा-या व्यक्तीस देता येईल.**

१) जर ती व्यक्ती केवळ आयुर्वेदामध्ये व्यवसाय करीत असेल, किंवा करण्याची इच्छा असेल,
२) जर त्या व्यक्तीस आयुर्वेद औषध पद्धतीविषयी ज्ञान अथवा अनुभव असेल,
३) जर ती व्यक्ती ॲलोपॅथी व/किंवा होमिओपॅथी या औषधपद्धतीमध्ये व्यवसाय करीत नसतील, किंवा करू इच्छित नसतील,
४) जर ती व्यक्ती महाराष्ट्र वैद्यक व्यवसायी अधिनियम १९६१ मधील कलम ३७ खालील तरतूदीमधील अटींची पूर्तता करीत असतील,

वरील प्रयोजनासाठी ग्रामीण भाग या संज्ञेची व्याख्या महाराष्ट्र वैद्यक व्यवसायी अधिनियम १९६१ मधील कलम ३७ खाली स्पष्टीकरणात दिल्याप्रमाणे राहील.

ब) अनुमती देण्यासाठी अनुसरावयाची कार्यपद्धती :-

१) कलम ३७ खालील तरतूदीच्या आधारे ग्रामीण भागात व्यवसाय करण्यास अनुमती मिळविण्यासाठी या शासन निर्णयासोबत जोडलेल्या विवरणपत्र क्र. १ मध्ये दिलेल्या नमून्यात, अशी अनुमती मिळविण्यास इच्छूक असलेल्या व्यक्तीने संबंधित जिल्ह्याच्या जिल्हाधिका-याकडे अर्ज करणे आवश्यक राहील. सदर अर्जासोबत नापरताावा शुल्क रू. १५०० ( रूपये एक हजार पाचशे ) फक्त जिल्हाधिकारी यांच्या कार्यालयास भरेल व अर्जासोबत शुल्क भरल्याच्या पावतीची छायाप्रत जोडून अर्जाची एक प्रत जिल्हाधिकारी यांना व अर्जाची दुसरी प्रत ज्या खेडेगावात वैद्यकिय व्यवसाय करण्यासाठी त्यास अनुमती हवी आहे, त्या खेडेगावच्या ग्रामपंचायतीस सादर करेल. अर्जदारास कांही पुरावा अथवा माहिती ह्या अर्जासोबत सादर करावयाची असेल, तर तो पुरावा अथवा माहिती सदर अर्जासोबत सादर करेल.

२) अर्जदाराचा अर्ज प्राप्त झाल्यावर, अर्जाची छाननी संबंधित ग्रामपंचायतीचे ग्रामसेवक करतील. अर्जदाराने सादर केलेला पूरावा व माहिती ग्रामसेवक विचारात घेतील. अर्जदाराने ज्या तारखेस वैद्यकिय व्यवसाय सुरू केला त्या तारखेपूर्वी त्या गावात कोणी नोंदणीकृत व्यवसायीने वैद्यकिय व्यवसाय सुरू केला होता अथवा कसे किंवा त्या तारखेपूर्वी गावात सरकारी आरोग्य केंद्र कार्यरत होते काय ? जर अर्जदाराने अद्याप व्यवसाय सुरू केला नसल्यास सद्यःस्थितीत त्या खेडेगावात कोणी नोंदणीकृत व्यवसायी व्यवसाय करीत आहे अथवा कसे ? तसेच सद्यःस्थितीत गावात सरकारी आरोग्य केंद्र कार्यरत आहे काय ?, तसेच अर्जदार दर नमद केलेल्या सर्व अटींची पूर्तता करतो अथवा कसे ? हे तपासून आपला अहवाल ग्रामसेवक सरपंचास सादर करतील. सरपंच ग्रामसेवकाचा अहवाल ग्रामपंचायतीच्या बैठकीत ठेवतील. ग्रामपंचायत आवश्यक तो ठराव मंजूर करून घेईल व या शासन निर्णयासोबत जोडलेल्या विवरणपत्र क्र. २ मध्ये दिलेल्या नमून्यात ठरावाची प्रत, ग्रामसेवकाच्या अहवालाची प्रत व अर्जदाराच्या अर्जाची प्रत संबंधित तालुक्याच्या तहसिलदाराकडे पाठविल.

३) ग्रामपंचायतींकडून अर्जदाराचा अर्ज व ग्रामपंचायतीचा ठराव प्राप्त झाल्यानंतर तहसिलदार ग्रामपंचायतीच्या ठरावाची योग्यायोग्यता तपासून पाहून आपली शिफारस संबंधित जिल्ह्याच्या जिल्हाधिका-यास कळवतील.

४) तहसिलदारांकडून शिफारस प्राप्त झाल्यानंतर जिल्हाधिकारी, बोगस डॉक्टर शोध माहिमेसाठी शासन निर्णय क्र. सीआयएम १०९९ / १७२६ / प्र. क्र. ३५५ / ९९ / अधिनियम, दि. ७.२.२००० अन्वये स्थापन करण्यात आलेल्या पुनर्विलोकन समितीच्या बैठकीत अर्जदाराच्या अर्जावर निर्णय घेतील.

५) उक्त समितीने, जर अर्जदारास व्यवसाय करण्यास अनुमती देण्याचे ठरविले तर, त्याबाबतचे आदेश जिल्हाधिकारी अथवा त्यांनी प्राधिकृत केलेले उपजिल्हाधिकारी अर्जदारास व संबंधित ग्रामपंचायतीस देतील. जर अर्जदारास अनुमती न देण्याचे समितीने ठरविले, तर तसे अर्जदारास व संबंधित ग्रामपंचायतीस कळवतील. ज्या अर्जदारास अनुमती नाकारण्यात आली आहे, त्या अर्जदाराने भरलेले शुल्क त्यास परत करण्यात येणार नाही.

६) ज्या अर्जदारांना कलम ३७ च्या आधारे वैद्यकिय व्यवसाय करण्यास अनुमती देण्यात आली आहे, अशा व्यवसायिकांची नोंद संबंधित जिल्ह्याचे जिल्हा आरोग्य अधिकारी एका स्वतंत्र नोंदवहीत ठेवतील. सदर नोंदवहीत व्यवसायिकाचे नाव, पत्ता, त्यास ज्या गावात व्यवसाय करण्याची अनुमती दिली आहे, त्या गावाचे नाव, व्यवसायिकाने व्यवसाय सुरू केल्याचा दिनांक, इत्यादी तपशील नमूद करण्यात यावा.

तसेच जिल्हाधिकारी यांच्या कार्यालयाने निर्गमित केलेल्या आदेशाची प्रत नोंदवहीसह जतन करण्याची जबाबदारी जिल्हा आरोग्य अधिकारी यांची राहील.

७) अर्जदाराने अर्ज सादर केल्याच्या दिनांकापासून शक्यतो ३ महिन्याच्या आत जिल्हा पुनर्विलोकन समिती निर्णय घेईल. असे निर्णय घेताना कांही विशिष्ट व्यक्तिगत प्रकरणी कोर्टाचे आदेश असल्यास तेही विचारात घ्यावेत

८) याचिका क्र.२९१५ / २००१ मध्ये मुंबई उच्चन्यायालयाने दिलेल्या निर्णयाप्रमाणेच ज्या व्यवसायिकांनी दाखल केलेल्या याचिकांवर न्यायनिर्णय झालेला आहे, अशा अर्जदारानी वरीलप्रमाणे केलेल्या अर्जावर अंतीम निर्णय होईपर्यंत अर्जदारावर बोगस डॉक्टर म्हणून कारवाई करण्यात येऊ नये. वरीलप्रमाणे अनुमती मिळविल्याखेरीज जर कोणी वैद्यकिय व्यवसाय करताना आढळल्यास, त्याचा व्यवसाय अनधिकृत समजून त्याच्यावर महाराष्ट्र वैद्यक व्यवसायी अधिनियम १९६१ मधील तरतूदीनुसार त्यांच्यावर कारवाई करण्यात येईल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

( सु. ना. रणखांबे )
शासनाचे अवर सचिव

प्रति,

- सचिव, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई,
- सचिव, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई,
- सचिव, ग्राम विकास व जलसंधरण विभाग, मंत्रालय, मुंबई,
- सचिव, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई,
- सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई,
- सर्व जिल्ह्याचे जिल्हाधिकारी, ( त्यांना विनंती करण्यात येते की सदर शासन निर्णयाच्या प्रती त्यांनी त्यांच्या जिल्ह्यातील सर्व तहसिलदार, ग्रामसेवक व अन्य संबंधितास पाठवाव्यात. )
- पोलिस महासंचालक, मुंबई
- आयुक्त, अन्न व औषधे प्रशासन, मुंबई
- सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
- सर्व पोलिस आयुक्त,
- सर्व जिल्ह्यांचे जिल्हा पोलीस अधिक्षक,
- सर्व जिल्हा शल्य चिकित्सक,
- सर्व अधिष्ठाता, शासकिय वैद्यकिय महाविद्यालय,
- सर्व जिल्ह्याचे जिल्हा आरोग्य अधिकारी,
- सर्व जिल्ह्याचे जिल्हा माहिती अधिकारी,
- संचालक, आयुर्वेद संचालनालय, मुंबई
- प्रबंधक, महाराष्ट्र कौन्सिल ऑफ इंडियन मेडिसिन, मुंबई
- प्रबंधक, महाराष्ट्र होमिओपॅथी कौन्सिल, मुंबई,
- प्रबंधक, महाराष्ट्र स्टेट फार्मसी कौन्सिल, मुंबई,
- प्रबंधक, महाराष्ट्र मेडिकल कौन्सिल, मुंबई,
- वैद्यकिय शिक्षण विभागातील सर्व उपसचिव/अवर सचिव/कक्ष अधिकारी,
- निवड नस्ती, अधिनियम

9/

-15-

विवरणपत्र क्र.१

## अर्जाचा नमूना

प्रति,

जिल्हाधिकारी,
जिल्हा__________

**विषय:-** महाराष्ट्र वैद्यक व्यवसायी अधिनियम १९६१ मधील कलम ३७ नुसार ग्रामीण भागात वैद्यकिय व्यवसाय करण्यास अनुमती मिळण्याविषयी

महोदय,

मी महाराष्ट्र वैद्यक व्यवसायी अधिनियम १९६१ मधील कलम ३७ नुसार ग्रामीण भागात वैद्यकिय व्यवसाय करण्यासाठी अनुमती मिळण्याकरिता अर्ज करीत आहे. माझी व्यक्तिगत माहिती खाली दिल्याप्रमाणे आहे.

१) नाव :-

२) जन्मतारीख :-

३) पत्ता:-

४) *अ) (१) वैद्यकिय व्यवसाय करीत असलेल्या गावाचे नाव :-

(२) या ठिकाणी कोणत्या तारखेपासून व्यवसाय करीत आहे :-

(३) ज्या तारखेस व्यवसाय केला त्यावेळी गावात कोणी नोंदणीकृत वैद्यकिय व्यवसायी व्यवसाय करीत होता काय, अथवा सरकारी आरोग्यकेंद्र कार्यरत होते काय ? :-

*ब) (१) नव्याने व्यवसाय सुरू करावयाचा असल्यास गावाचे नाव :-

(२) या ठिकाणी नोंदणीकृत व्यवसायी अथवा सरकारी आरोग्य केंद्र कार्यरत आहे काय? :-

५) अर्हता :-

६) आयुर्वेद औषधपद्धतीचे ज्ञान कशाप्रकारे आत्मसात केले आहे ? व त्याबाबतचा व्यवसायिक अनुभव :-

७) अर्जदाराने कोर्टात याचिका दाखल केली असल्यास व त्याबाबतीत कांही कोर्टाचे आदेश असल्यास त्याबाबतची माहिती :- ( न्याय निर्णयाची प्रत सोबत जोडावी )

*मी उक्त गावी आयुर्वेद औषधपद्धतीत व्यवसाय करीत आहे, / उक्त गावात मी केवळ आयुर्वेद औषधपद्धतीत व्यवसाय करू इच्छितो. मी ॲलोपॅथी वा होमिओपॅथी या पॅथीमध्ये व्यवसाय करणार नाही. मला ज्ञात आहे की मी जर ॲलोपॅथी वा होमिओपॅथी या पॅथीमध्ये व्यवसाय केला, तर माझा वैद्यकिय व्यवसाय अनधिकृत समजला जाईल व मी महाराष्ट्र वैद्यक व्यवसायी अधिनियम १९६१ मधील तरतूदीनुसार कारवाईस पात्र ठरेन.

मी रू. १५०० शुल्क आपल्या कार्यालयात भरले असून त्याबाबतच्या पावतीची प्रत सोबत जोडली आहे. मला ज्ञात आहे की, जरी मला वैद्यकिय व्यवसाय करण्यास अनुमती नाकारण्यात आली, तरी हे शुल्क मला परत करण्यात येणार नाही.

* लागू नसेल ते खोडावे.

आपला,

दिनांक:- सही ____________________

<u>प्रत आवश्यक त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित,</u>

ग्राम सेवक, ग्रामपंचायत,
गाव:-
तालुका:-
जिल्हा:-

त्यांना मी कळवू इच्छितो की, सदर अर्ज मी जिल्हाधिकारी, जिल्हा ____________________ यांच्याकडे दि.____________________ रोजी रू. १५०० इतके शुल्क भरून सादर केलेला आहे. शुल्क भरले असल्याबाबतची पावती सोबत जोडावी.

विवरणपत्र क्र. २

ग्रामपंचायतीचा ठराव ( नमूना )

______ ग्रामपंचायतीची सभा दि. ______ रोजी बोलावण्यात आली होती. सदर बैठकीस खालील सभासद हजर होते.

१)
२)
३)
४)

वरील बैठकीत अर्जदार श्री / श्रीमती ______ यांचा महाराष्ट्र वैद्यक व्यवसायी अधिनियम १९६१ मधील कलम ३७ नुसार आपल्या गावात वैद्यकिय व्यवसाय करण्यास अनुमती मिळण्याविषयीच्या अर्जावर विचार करण्यात आला. या अर्जाची छाननी करून ग्रामसेवकांनी दिलेला अहवाल सर्व सदस्यांना वाचून दाखविण्यात आला.

* ग्रामसेवकांनी दिलेल्या अहवालानुसार ही ग्रामपंचायत असा ठराव मंजूर करीत आहे की, अर्जदार श्री / श्रीमती ______ यांनी या गावात दि. ______ पासून वैद्यकिय व्यवसाय करीत आहेत. त्या तारखेस या गावात कोणताही नोंदणीकृत वैद्यकिय व्यवसायिकाने आपला व्यवसाय सुरू केलेला नव्हता. तसेच या तारखेस गावात सरकारी आरोग्य केंद्रही कार्यरत नव्हते. यास्तव ही ग्रामपंचायत आपल्या गावात श्री / श्रीमती ______ यांना वैद्यकिय व्यवसाय करण्याची अनुमती देण्यास हरकत नाही, अशी शिफारस ही ग्रामपंचायत करीत आहे.

* ग्रामसेवकांनी दिलेल्या अहवालानुसार ही ग्रामपंचायत असा ठराव मंजूर करीत आहे की,--- अर्जदार श्री / श्रीमती ______ हे या गावात वैद्यकिय व्यवसाय करू इच्छितात. आजमितीस या गावात कोणत्याही नोंदणीकृत वैद्यकिय व्यवसायिकाने आपला व्यवसाय सुरू केलेला नाही. तसेच आजमितीस या गावात सरकारी आरोग्य केंद्रही कार्यरत नाही. यास्तव ही ग्रामपंचायत आपल्या गावात श्री / श्रीमती ______ यांना वैद्यकिय व्यवसाय करण्याची अनुमती देण्यास हरकत नाही, अशी शिफारस ही ग्रामपंचायत करीत आहे.

* लागू असेल त्याप्रमाणे अथवा ग्रामपंचायतीने अर्जदाराची विनंती फेटाळण्याचा निर्णय घेतला असल्यास त्याप्रमाणे कारणे दर्शवून,( जसे की, गावात नोंदणीकृत वैद्यकिय अधिकारी अथवा सरकारी आरोग्य केंद्र अर्जदाराने व्यवसाय सुरू करण्याच्या आगोदरच्या तारखेपासून कार्यरत आहे, ) नमूद करावे.

ग्रामसेवकांचे नाव व सही

सरपंचांचे नाव व सही

## बोगस मेडिकल डिग्री, डिप्लोमा व रजिस्ट्रेशन निर्गम करणाऱ्या संस्था

याव्दारे सर्वांना सावधान करण्यात येते की, खालील संस्थांचे अभ्यासक्रम व रजिस्ट्रेशन मान्यता प्राप्त नाहीत.

| | |
|---|---|
| १] कला सांस्कृति साहित्यायुर्वेद विद्यापीठ दिल्ली व्दारा दिल्या गेलेल्या | : डी. एच. एम. एस, बी. ए. एम. एस. एम. बी. बी. एस. व इतर पदव्या मान्यता प्राप्त नाहीत. |
| २] मेडिकल सिंडीकेट कलकत्ता | : बोगस असून मान्यता प्राप्त नाही. |
| ३] सेन्ट्रल कॉन्सील ऑफ आयुर्वेदिक ॲन्ड ॲलोपॅथीक दिल्ली | : ही एक संघटना आहे व रजिस्ट्रेशन देण्याचा अधिकार नाही. |
| ४] इंडियन मेडिकल कॉन्सील ऑफ प्रॅक्टीशनर्स दिल्ली | : [ वरील प्रमाणे ] |
| ५] सरल मेडिकल प्रॅक्टीशनर्स लखनौ [आर.एम.पी.]कानपूर | : वरील प्रमाणे. |
| ६] सेन्ट्रल कॉन्सील ऑफ इंडिया | : वरील प्रमाणे. |
| ७] इलेक्ट्रो पॅथी कॉलेज, पाटना | : अभ्यासक्रम मान्यता प्राप्त नाही. |
| ८] कॉलेज ऑफ ॲलोपथीक सिस्टीम ऑफ मेडिसीन पाटना | : वरील प्रमाणे. |
| ९] पत्राचार संस्थान कानपूर | : वरील प्रमाणे. |
| १०] इंडियन मेडीकल कॉलेज पाटना | : अभ्यासक्रम मान्यता प्राप्त नाही. |
| ११] डॉ. नालमवार [ प्रिन्सिपाल ] महाराष्ट्र होमीओपॅथीक व बायोकेमिक कॉलेज विजया भुवन गोकुल पेठ नागपूर. | : राज्यसरकारची व महाराष्ट्र होमीओपॅथीक बोर्डची मान्यता नाही. |
| १२] डॉ. आहुजा होमीओपॅथीक कॉलेज चेंबूर., बंम्बई. | : वरील प्रमाणे. |
| १३] साथी होमीओपॅथीक कॉलेज लहरीसराय बिहार. | : मान्यता प्राप्त नाही. |
| १४] इलेक्ट्रोपॅथी मेडीकोज ऑफ इंडिया दिल्ली आणि संबंधीत भारतातील सर्व इलेक्ट्रोपॅथी कॉलेजस. | : ही एक प्रायव्हेट संस्था असून केन्द्र सरकारची किंवा कोणत्याही राज्यसरकारची या डी इ एम एस., बी. इ. एम. एस. अभ्यासक्रमास मान्यता नाही. |
| १५] प्रायव्हेट मेडीकल प्रॅक्टीशनर्स असोसिएशन, औरंगाबाद/दिल्ली. | : सी. ए. एम. एस. / पी. एम. पी. प्रमाणपत्रा, मान्यता प्राप्त नाही. भारतातील कोणत्याही राज्यसरकारची मान्यता नाही. ही एक संघटना आहे. प्रमाणपत्रा देण्याचा अधिकार नाही. |

...२

| | |
|---|---|
| | क्रमांक १५ प्रमाणे |
| १६] इंडियन मेडिकल प्रॅक्टीशनर्स असोसिएशन कानपूर. | : [ वरील प्रमाणे ] |
| १७] -संजीवनी मेडिकल सेंटर, कुडगांव अहमदनगर. | : अभ्यासक्रम मान्यता प्राप्त नाही. |
| १८] डॉ. साठवणे ग्रामीण आरोग्य सेवा, संघटन वर्धा | : व्ही. एस. पी. मान्यता प्राप्त नाही. |
| १९] डॉ. डी. एल. रघुते कुकडे लेआऊट, नागपूर. | : सर्वच डिग्री बोगस असून मान्यता प्राप्त नाहीत. |
| २०] डॉ. भिवगडे क्र. एन. एच. मेडीकल कॉलेज नागरपूर. | : वरील प्रमाणे |

मान्यता प्राप्त अभ्यासक्रम ओळखण्यासाठी काही मुद्दे

१] अभ्यासक्रम हा केंद्रीय चिकीत्सा परिषाद व्दारा मान्यता प्राप्त असावा किंवा भारतातील कोणत्याही राज्यातील बोर्ड व्दारा रजिस्ट्रेशन साठी मान्यता प्राप्त असावा.

२] भारतात एलोपॅथीला एम. बी. बी. एस. शिवाय दुसरा कोणताही अभ्यासक्रम नाही. व ॲलोपॅथीचे रजिस्ट्रेशन एम. बी. बी. एस. उत्तीर्ण केल्याशिवाय मिळत नाही.

३] भारतात १९७० पासून पुढे आयुर्वेदिक फक्त खालील अभ्यासक्रम आहेत.[ १९७० चा सी. सी. आय. एम. ॲक्ट ४८,] आयुर्वेदाचार्य / बी. ए. एम. एस. [मान्यता प्राप्त विद्यापीठ ], आयुर्वेद -भिषक, आ.वै. वि. ,आयुर्वेदाचार्य [ नी. भा. आ. वि. दिल्ली ] [वैद्यविशारद/आयुर्वेदरत्न [हि.सा.स.प्रयाग] फक्त मध्यप्रदेश बोर्डाची मान्यता आहे. ] होमीओपॅथीमध्ये १९७३ पासून पुढे एल. सी. इ. एच., डी. एच. बी. ,डी. एच. एम. एस. व बी. एच. एम. एस हेच अभ्यासक्र म आहेत. [ सी. सी. एच. ॲक्ट १९७३ प्रमाणे ]

४] डिग्री जर मान्यता प्राप्त असेल तर धारक स्वत: बोर्डात जाऊन रजिस्ट्रेशन करून घेऊ शकतो व इतरांच्या मदतीची गरज पडत नाही.

- अधिक माहितीसाठी लिहा -

| रजिस्ट्रार | निर्देशक | रजिस्ट्रार |
|---|---|---|
| केन्द्रीय होमोओपॅथीक परिषद<br>१० कॅम्युनीटी सेंटर,वसंत विहार,<br>न्यु दिल्ली ११००५७. | स्वास्थ मंत्रालय<br>भारत सरकार,<br>नई दिल्ली.<br>११००११ | भारतीय केन्द्रीय चिकीत्सा परिषद,१,इ/६ रामतिर्थ नगर,झोन्डेवाला,एक्स्टेन्शन, नई दिल्ली ११००५५. |